वर्ष : ०४ | अंक: १४ | मुंबई, मंगळवार २७ फेब्रुवारी २०१८ ते ५ मार्च २०१८ | पृष्ठ: ४

R.N.I. No. MAHMAR/2014/60133

मूल्य २/- रुपये

# पोलीस बातमी पत्र


POSTAL REGISTRATION NO. THW/205/2016-2018

संपादक:- दिपक मोरेश्वर नाईक | कार्यकारी संपादक:- गुरुप्रसाद दिपक नाईक

PG 2 २४ तास पाणीपुरवठा विसरा!

3 → जग हे 'बंदी'शाळा..

ऐतिहासिक मुलाखतीनंतर शरद पवारांची काळजी वाटते ← 4




# महागाईने होणारी देशवासीयांची होरपळ थांबणार कधी?



**सन २०१४ मध्ये झालेल्या लोकसभा निवडणुकीतील प्रचार आपल्याला आठवत असेल. त्यावेळी भारतीय जनता पार्टीने महागाईवरून रान उठविले होते. सामान्य नागरिक महागाईने होरपळून निघत असल्याची सर्वत्र ओरड होती. स्वत: अर्थतज्ज्ञ असून महागाई रोखण्यात अपयश आल्याचे आरोप त्यावेळचे पंतप्रधान डॉ. मनमोहन सिंग यांच्यावर केले गेले. सरकारने महागाईला मोकळे रान देऊन सर्वसामान्यांना वाऱ्यावर सोडले, असे विरोधी पक्षातील प्रत्येक नेता त्यावेळी सांगत होता. निवडणुकीत आणखीही बरेच मुद्दे होते, पण महागाईवरून रणकंदन माजविले गेले होते.**

याचा परिणाम असा झाला की, भारतीय जनता पार्टी सत्तेवर आली तर ती महागाईला आळा घालेल, असा सर्वसामान्य मतदारांनी समज करून घेतला. त्याच आशेवर लोकांनी भाजपाला मते दिली. भाजपा सत्तेवर आली आणि तेव्हापासून महागाई केव्हा कमी होईल, याची लोक फक्त वाटच पाहात आहेत. सरकार अधून-मधून महागाईशी संबंधित आकडेवारी जाहीर करत असते. या आकडेवारीचा नेमका अर्थ अर्थतज्ज्ञच जाणू शकतात. सरकारच्या महागाई निर्देशांकाचा लोकांच्या दैनंदिन जीवनाशी काही मेळ बसत नाही. त्याला फक्त गेल्या महिन्यात डाळीचा भाव काय होता व आता काय आहे, एवढेच कळते. त्याला फक्त बाजारातील भाजीपाल्याच्या भावातील चढ-उतार समजतात. अशी आकडेवारी देऊन सरकार महागाई कमी झाल्याचे दाखविण्याचा प्रयत्न करते. परंतु महागाई कमी न होता सतत वाढत चालली आहे, ही वस्तुस्थिती आहे. काही प्रकारची महागाई आपल्याला सरळसरळ दिसते तर काही प्रकारची महागाई आपल्याला अप्रत्यक्षपणे सोसावी लागते. डिझेल व पेट्रोलच्या किंमती पाहिल्या तर हे आपल्या लक्षात येईल. पेट्रोल महागले की त्याचा परिणाम कुटुंबाच्या बजेटवर होतो. डिझेलची किंमत वाढली की, अन्नधान्यापासून भाजीपाल्यापर्यंत अनेक वस्तूंच्या किंमती वाढतात.

डॉ. मनमोहन सिंग पंतप्रधान असताना आंतरराष्ट्रीय बाजारात तेजी होती त्यामुळे भारतातही पेट्रोलियम पदार्थांचे दर चढे होते. त्यावेळी आंतरराष्ट्रीय बाजारात कच्च्या तेलाचा भाव बॅरलला १०५ डॉलरपर्यंत पोहोचला होता. सरकार काही करू म्हटले तरी काही करू शकत नव्हते. भाजपा सरकारच्या काळातील परिस्थिती याच्या नेमकी उलटी आहे. हे सरकार सत्तेवर आले आणि आंतरराष्ट्रीय बाजारात तेलाच्या किमती सतत कमी होत गेल्या आणि एका टप्प्याला ४८.५० डॉलर एवढ्या निचांकावर पोहाचल्या. भाजपा सरकारने मनात आणले असते तर देशातही पेट्रोल-डिझेलच्या किमती कमी करू शकले असते. पण तसे न करता उलट अधिभार व कर वाढवून सरकारनेच स्वत: भरपूर कमाई केली. जनतेला दिलासा देण्याचा कोणताही प्रयत्न झाला नाही.



# चांदनी निखळली



**'अभिनेत्री श्रीदेवी यांचे निधन' या बातमीने बॉलिवूडपासून ते हॉलिवूडपर्यंत, सर्वसामान्यांपासून ते सेलिब्रिटींपर्यंत सगळ्यानाच धक्का दिला आहे. पुतण्याच्या लग्नसमारंभात श्रीदेवी मुलगी आणि पतीसोबत दुबईला पोहोचल्या होत्या. लग्न सोहळ्यातील सेलिब्रेशनचे काही फोटोज् देखील त्यांनी इन्स्टाग्रामवर शेअर केले होते. शिवाय त्यांचा एक व्हिडीओदेखील सध्या सोशल मीडियावर वाऱ्यासारखा व्हायरल होत आहे. ज्यामध्ये त्या पती बोनी कपूरसोबत डान्स करताना बघावयास मिळत आहेत. एकुणच काही तासांपर्यंत अतिशय सामान्य आणि आनंदी जीवन जगणाड्या श्रीदेवी यांनी अचानकच एक्झिट घेतल्याने अनेकांना यावर विश्वास ठेवणे अवघड होत आहे. आज श्रीदेवी आपल्यात नाहीत यावर अजुनही अनेकांचा विश्वास बसत नाही.**

दरम्यान, श्रीदेवी यांच्या निधनाची बातमी समजताच इंडस्ट्रीतील अनेक बड्या सेलिब्रिटींसह त्यांच्या चाहत्यांना घराबाहेर एकच गर्दी केली. दुबईतील कायदेशीर प्रक्रियेमुळे त्यांचे पार्थिव आणण्यासाठी उशीर होणार आहे. मात्र, मृत्यूची बातमी समजल्यापासूनच चाहत्यांनी मुंबईतील त्यांच्या घरासमोर गर्दी केली होती. तसेच अनुपम खेर, शिल्पा शेट्टी आर्दीनी अनिल कपूर यांच्या घरी भेट देत कपूर परिवाराचे सांत्वन केले.

एका नातेवाईकाच्या विवाह सोहळ्यासाठी दुबईला गेलेल्या श्रीदेवींची प्राणज्योत मालवल्याने त्यांच्या चाहत्यांना मोठा धक्का बसला आहे. मृत्युसमयी त्यांच्यासोबत त्यांचे पती बोनी कपूर, लहान मुलगी खुशी होती. तर मोठी मुलगी जान्हवी चित्रिकरणानिमित्त मुंबईत होती.

# दिल्लीतली वाढती अराजकता



*दुसरीकडे, अधिकारी संघटनेने मारहाणीचा निषेध करीत व माफीनाम्याची मागणी करीत राज्य सरकारविरोधात असहकार आंदोलन पुकारले आहे. दिल्लीची सरकारी आणि प्रशासकीय व्यवस्था विद्यमान घडामोडींमुळे कोलमडण्याची भीती निर्माण झाली आहे. मारहाणीच्या या घटनेमुळे केंद्र आणि राज्य सरकारदेखील आमनेसामने आले आहेत. एकंदर दिल्लीच्या अराजकतेत दिवसेंदिवस भर पडत चालली असल्याचे विदारक चित्र आहे.*

एकाच वेळी काँग्रेस आणि भाजप या प्रस्थापित राजकीय पक्षांना विरोध करीत दिल्ली विधानसभेच्या ७० पैकी ६७ जागा जिंकण्याची ऐतिहासिक कामगिरी अरविंद केजरीवाल यांच्या आम आदमी पक्षाने २०१५ सालच्या सुरुवातीस केली होती. एकाच पक्षाला एकहाती सत्ता मिळाल्याने आपले भले होईल, अशी भोळीभाबडी आशा दिल्लीकरांनी बाळगली होती. तथापि, गेल्या तीन वर्षांचा 'आप' सरकारचा कारभार पाहिला तर चांगल्यापेक्षा वाईट कारणांसाठीच हे सरकार आणि या पक्षाचे बहुतांश नेते प्रसिद्धीस आले आहेत. लाभाचे पद प्राप्त केल्याचा ठपका ठेवत निवडणूक आयोगाने पक्षाच्या २० आमदारांचे सदस्यत्व रद्द केले होते. हा पक्षाचा अगदी ताजा इतिहास आहे. तब्बल वीस जणांची आमदारकी रद्द झाल्याने 'आप'च्या गोटात संताप आणि अस्वस्थता असणे स्वाभाविक आहे; पण त्याचे खापर दिल्ली सरकारच्या मुख्य सचिवांवर फुटेल, याची कोणीही कल्पना केली नसावी. सुरुवातीला अंशू प्रकाश यांना मारहाण झालीच नसल्याचा दावा आम आदमी पक्षाकडून करण्यात आला होता. तथापि, मोबाईलवरून झालेले रेकॉर्डिंग आणि घटनास्थळाचे सीसीटीव्ही फुटेज पोलिसांनी ताब्यात घेतल्यानंतर 'आप'चे पितळ उघडे पडले आहे. यातच मुख्यमंत्री केजरीवाल यांचे सल्लागार व्ही. के. जैन यांनी अंशू प्रकाश यांना आमदारांनी मारहाण केल्याची कबुली न्यायालयात दिल्याने केजरीवाल यांच्यासमोरचे संकट वाढले आहे. ज्यावेळी प्रकाश यांना मारहाण झाली, त्या ठिकाणी खुद्द केजरीवाल हे उपस्थित होते. त्यामुळे पोलिसांकडून हे प्रकरण कसे हाताळले जाणार, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

# ३१ मार्चपूर्वी मुंबईचा नवीन डीपी!



**मुंबई - मुंबई शहराचा रखडलेला नवीन प्रारुप विकास आराखडा येत्या ३१ मार्चपूर्वी मंजूर करण्यात येणार असल्याची घोषणा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केली. गेली चार वर्षापासून मुंबई शहराचा सुधारित विकास आराखडा रखडलेला आहे. मुख्यमंत्र्यांच्या या घोषणेने मुंबईचा नवीन डीपीला येत्या महिनाभरात मंजुरी दिली जाणार असल्याचे स्पष्ट झाले आहे.**

मुंबईचा सुधारित प्रारुप विकास आराखडा २०१४ पासून प्रलंबित आहे. तत्कालीन महापालिका आयुक्त सीताराम कुंटे यांच्या काळात तयार करण्यात आलेल्या विकास आराखड्यावरुन मोठा गोंधळ उडाला होता. या डीपीमधून मुंबईतील हाजीअलीसहीत अनेक हेरिटेज वास्तू गायब झाल्या होत्या. अनेक ठीकाणी चुकीची आरक्षणे टाकण्यात आली होती. डीपीतील या त्रुटी समोर आल्यानंतर या डीपीला सर्वच स्तरातून विरोध झाला. पक्षीय राजकारणही रंगले. अखेर मुंबई भाजपचे अध्यक्ष ॲड. आशिष शेलार यांनी हा डीपी रद्द करण्याची मागणी मुख्यमंत्र्यांकडे केल्यानंतर प्रस्तावित डीपी रद्द करण्यात आला. मुंबई महापालिकेचे विद्यमान आयुक्त अजोय मेहता यांच्या नेतृत्वाखाली नवीन डीपी तयार करण्यात आला आहे. या डीपीला मुंबई महापालिकेच्या सर्वसाधारण सभेनेही मान्यता दिली आहे. त्यानंतर तो राज्य सरकारकडे मंजुरीसाठी पाठविण्यात आला आहे. मुख्यमंत्र्यांनी डीपीला मंजुरीसाठी ३१ मार्च ही डेडलाईन निश्चित केली आहे.

## सौजन्य व्हॉट्सअप




# राज्य सरकारचे काउंटडाऊन सुरू!

**मुंबई - 'मोदी' पॅटर्नच्या अपयशामुळे राज्यात 'नीरव' शांतता पसरलेली असून गेल्या साडेतीन वर्षात सरकारने अक्षम्य चुका केल्या, त्याचा मोठा फटका सर्वसामान्य नागरिकांना, शेतकऱ्यांना सोसावा लागला आहे. आपल्या सर्व पापांचे प्रायश्चित करण्याची व चुका सुधारून जनतेला न्याय देण्याची अर्थसंकल्पाच्या रूपाने सरकारकडे शेवटची संधी असल्याची टीका विरोधी पक्षनेते राधाकृष्ण विखे पाटील आणि धनंजय मुंडे यांनी रविवारी केली. 'मेक इन महाराष्ट्र' आणि 'मॅग्नेटिक महाराष्ट्र' या दोन्ही उपक्रमांबाबत सरकारने श्वेतपत्रिका काढावी, अशी मागणीही विखे पाटील यांनी यावेळी केली.**



सोमवारपासून राज्य विधिमंडळाचे अर्थसंकल्पीय अधिवेशन सुरू होत असून त्या पार्श्वभूमीवर सरकारविरोधी रणनीती ठरवण्यासाठी सर्व विरोधी पक्षांच्या गटनेत्यांची बैठक बोलावण्यात आली होती. या बैठकीनंतर आयोजित करण्यात आलेल्या पत्रकार परिषदेत विरोधी पक्षांचे नेते बोलत होते. या बैठकीत राज्य सरकारच्या चहापानावर बहिष्कार घालण्याचा निर्णय झाल्याचे विरोधकांनी स्पष्ट केले.

## 'आत्महत्या नव्हे, हत्या!'

शेतकरी धर्मा पाटील यांनी केलेली आत्महत्या ही सरकार आणि दलालांनी केलेली हत्या असल्याचा आरोप करून विखे-पाटील म्हणाले, गेल्या साडेतीन वर्षात सरकारने अक्षम्य चुका केल्या आहेत. त्याचा मोठा फटका सर्वसामान्यांना सहन करावा लागत आहे. कथित ऐतिहासिक कर्जमाफी जाचक नियम आणि अटी आणि ऑनलाइन, ऑफलाइन गोंधळात अडकली. कर्जमाफीनंतरही राज्यात दोन हजार शेतकऱ्यांच्या आत्महत्या झाल्या आहेत. सरकारने कर्जमाफीत ३६ लाख शेतकऱ्यांचा सातबारा कोरा करणार असल्याची घोषणा केली. आतापर्यंत त्यापैकी केवळ १९ लाख २४ हजार शेतकऱ्यांचा सातबारा कोरा झाल्याचे सरकार सांगत आहे. सरकार फक्त जाहिरातबाजीत पुढे आहे.



# २४ तास पाणीपुरवठा विसरा!

## मुंबईत 24 तास पाणीपुरवठा करण्याबाबत 2007 वर्षांच्या आधीपासून घोषणा सुरू आहेत

**मुंबई- गेली दहाहून अधिक वर्षे मुंबईकरांना दाखवलेले २४ तास पाणीपुरवठ्याचे स्वप्न नजीकच्या काळात पूर्णत्वाला जाण्याची कोणतीही शक्यता नाही. मुलुंड व वांद्रे येथील वस्तीत २४ तास पाणीपुरवठ्याचा प्रायोगिक प्रकल्प सुरू करण्यासाठी गेली तीन वर्षे काम केल्यावर आता या ठिकाणी केवळ पाणीपुरवठ्याच्या तासांमध्ये वाढ होऊ शकेल, असे प्रशासकीय अधिकाऱ्यांनी स्थायी समितीच्या बुधवारच्या बैठकीत स्पष्ट केले.**



आंतरराष्ट्रीय शहर असलेल्या मुंबईत २४ तास पाणीपुरवठा करण्याबाबत २००७ वर्षांच्या आधीपासून घोषणा सुरू आहेत. या घोषणेवरून निवडणुकाही लढवल्या गेल्या. संपूर्ण शहरात पाणीपुरवठा करण्यासाठी मुलुंड व वांद्रे येथे प्रायोगिक तत्त्वावर पाणीपुरवठा सुरू करण्यासाठी २०१४ मध्ये कामाला सुरुवात झाली. या कामासाठी ३०० कोटी रुपयांच्या खर्चाचा अंदाज होता. हे काम वर्षभरात पूर्ण होऊन २०१९ मध्ये संपूर्ण शहरात २४ तास पाणीपुरवठा सुरू होईल, असे प्रशासनाचे मत होते. प्रत्यक्षात प्रायोगिक प्रकल्प सुरू करण्यासाठीच २०१८ साल उजाडले असून पहिल्या टप्प्याचे काम ऑगस्ट २०१८ पर्यंत पूर्ण होण्याचे आश्वासन अतिरिक्त आयुक्त संजय मुखर्जी यांनी स्थायी समितीच्या बैठकीत दिले. वांद्रे उपनगरात वेगवेगळ्या व्यासांच्या जलवाहिन्या टाकण्यासंबंधीचा ११ कोटी रुपयांचा प्रस्ताव बुधवारी चर्चेला आला तेव्हा स्थायी समितीच्या सदस्यांनी पाणीपुरवठ्याविषयी प्रश्न उपस्थित केले. यापूर्वी २९ नोव्हेंबर रोजी याच प्रकारचा प्रस्ताव आला होता तेव्हा मार्च २०१८ पर्यंत काम पूर्ण होण्याचे आश्वासन प्रशासनाने दिले होते. महत्त्वाचे म्हणजे ऑगस्ट २०१८ मध्ये प्रायोगिक प्रकल्पासाठीचे काम पूर्ण होईल तेव्हा या भागात पाणीपुरवठ्याचा कालावधी वाढेल, हे २४ तास पाणीपुरवठा करण्याच्या दृष्टीने पाऊल असेल, असे मुखर्जी म्हणाले. त्यामुळे ऑगस्टनंतरही या दोन्ही उपनगरांत २४ तास पाणीपुरवठ्याचे स्वप्न प्रत्यक्षात येणार नसल्याचे स्पष्ट होत आहे.

२४ तास पाणीपुरवठा करण्यासाठी जुन्या जलवाहिन्या बदलणे, आवश्यक येथे अधिक वाहिन्या टाकणे तसेच सध्याच्या जलवाहिन्या यंत्रणेचे मॅपिंग करणे आवश्यक आहे. जमिनीखालील जलवाहिन्यांच्या जाळ्यांचा नकाशा करणेच जलविभागाला डोईजड झाले आहे.

# गुन्हा नोंदविण्यास नकार पोलिसांना महागात पडणार!

**मुंबई-** पोलीस ठाण्यात गुन्हा नोंदविण्यास टाळाटाळ केली जाते, अशी तक्रार नेहमीच केली जाते. यापुढे मात्र अशी टाळाटाळ पोलीस ठाण्याच्या पातळीवर केली गेल्यास संबंधित पोलीस अधिकाऱ्यांना कारवाईला सामोरे जावे लागणार आहे. पोलीस ठाण्यात येणाऱ्या प्रत्येक अभ्यागताची नोंद ठेवण्याची नवी पद्धत राज्यातल्या आयुक्तालयांसह सर्व २९४ पोलीस ठाण्यात सुरु झाल्यामुळे आता गुन्हा नोंदविण्यास टाळाटाळ करणाऱ्या अधिकाऱ्यांना हेरून त्यांच्याविरुद्ध कारवाई केली जाणार आहे. राज्याचे पोलीस महासंचालक सतीश माथूर यांच्या संकल्पनेतून ही पद्धत उभी राहिली आहे. राज्याच्या पोलीस प्रमुखपदाची सूत्रे स्वीकारल्यानंतर माथूर यांनी राज्यातील सर्व पोलीस ठाण्यात तब्बल तीन महिने सर्वेक्षण केले. पोलीस ठाण्यात येणाऱ्या तक्रारींपैकी अनेक तक्रारींमध्ये गुन्हा दाखल करण्याची आवश्यकता असतानाही संबंधित पोलीस अधिकारी टाळाटाळ करीत असल्याचे या सर्वेक्षणात समोर आले. पोलीस ठाण्याचा गुन्हेगारी आलेख वाढू नये, असा त्यामागे वरिष्ठ अधिकाऱ्याचा प्रयत्न असला तरी बऱ्याचवेळा पोलिसांचा कामचुकारपणाही कारणीभूत असतो. गुन्हा नोंदविण्यास टाळाटाळ करण्याचे प्रमाण ५० टक्के असल्याचे या सर्वेक्षणात आढळून आले. त्यानंतरच 'व्हिजिटर मॅनेजमेंट सिस्टिम' (अभ्यागत व्यवस्थापन पद्धत) अमलात आणण्याचे ठरविण्यात आले, असे पोलीस महासंचालक माथूर यांनी सांगितले.



या पद्धतीत प्रत्येक पोलीस ठाण्यातील स्वतंत्र कर्मचारी वर्ग तैनात करण्यात आला आहे. पोलीस ठाण्यात येणाऱ्या प्रत्येक अभ्यागताची नोंद ठेवणे आणि तो कुठल्या कामासाठी आला होता, त्याचे समाधान झाले का आदी बाबींची नोंद संगणकात केली जाणार आहे. ही माहिती वरिष्ठांना एका क्लिकवर पाहता येणार आहे.

# महानगर पालिकेची १२ डायलिसिस केंद्रे कागदावरच!

**मुंबई-** सार्वजनिक खासगी भागीदारी तत्त्वावर मुंबईमध्ये १२ ठिकाणी डायलिसिस केंद्रे सुरू करण्याची पालिकेची योजना संस्थांची निवड प्रक्रिया संपून वर्ष झाली तरी अद्याप कागदावरच आहे. यातील निवड झालेल्या दोन संस्थांनी माघार घेतल्यामुळे १२ पैकी पाच केंद्रांचा प्रस्ताव बारगळला आहे. त्यामुळे या पाच केंद्रासाठी पुन्हा नव्याने निविदा काढण्याची नामुष्की पालिकेवर ओढावली आहे. मुंबईत नवी १२ डायलिसिस केंद्रे सुरू होणार असून १९९ डायलिसिस यंत्रे मुंबईत उपलब्ध होणार असल्याचे पालिकेने जुलै २०१६ मध्ये जाहीर करत यासाठी खासगी संस्थांची निवड करण्यासाठी निविदादेखील काढल्या. या निविदांमध्ये ३५० रुपयांपेक्षा कमी शुल्क देणाऱ्या संस्थां पात्र असतील असेही सांगण्यात आले. त्यानंतर जवळपास सहा महिन्यांनी ही निविदा प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर चार संस्थांची १२ केंद्रांसाठी निवड केली गेली. यामध्ये मानव संस्था (१ केंद्र), रहबर फाऊंडेशन (४ केंद्रे), बीईंग ह्यूमन द सलमान खान (१ केंद्र) आणि एकसॅग संजीवनी (४ केंद्रे) या संस्थांची निवड करण्यात आली



होती. मात्र या निवड प्रक्रियेलाही वर्ष उलटले तरी अद्याप एकाही संस्थेसोबत करार झालेला नाही. बीईंग ह्यूमन या संस्थेला आणि एकसॅग संजीवनी या संस्थाकडून योग्य प्रतिसाद मिळत नसल्याने पालिकेने वर्षभरानंतर आता फेब्रुवारीत या दोन्ही संस्थांना कारणे दाखवा नोटीस पाठविलेली आहे.



# कचऱ्याची विल्हेवाट रोखू शकत नाही

**मुंबई-** कांजूरमार्ग येथील कचराभूमीवर कचऱ्याची विल्हेवाट लावण्यास बंदी करावी, अशी या परिसरातील रहिवासी संघटनेने केलेली मागणी उच्च न्यायालयाने बुधवारी फेटाळून लावली. कचऱ्याची समस्या सध्या खूप भीषण झालेली असून दिवसाला सात हजारांहून अधिक मेट्रिक टन कचऱ्याची बेकायदेशीररीत्या विल्हेवाट लावली जाते. शिवाय शास्त्रोक्त पद्धतीने कचऱ्याची विल्हेवाट लावली जाणारी कांजूरमार्ग ही एकमेव कचराभूमी आहे. ही बाब लक्षात घेता या रहिवाशांची कचराभूमीवर कचरा टाकण्यास वा त्याची विल्हेवाट लावण्यास बंदी घातली जाऊ शकत नाही, असे न्यायालयाने स्पष्ट केले. मात्र त्याच वेळी घनकचरा व्यवस्थापन नियमांचेही विल्हेवाट लावताना काटेकोर पालन केले जाते का, याची पाहणी करून त्याचा महिनाभरात अहवाल सादर करण्याचे आदेश न्यायालयाने राज्य प्रदूषण नियंत्रण मंडळाला दिले आहेत. कन्नमवारनगर गृहनिर्माण सहकारी संस्थेने जनहित याचिका करीत या कचराभूमीवर कचरा टाकण्यास वा त्याची विल्हेवाट लावण्यास बंदी घालण्याची मागणी केली होती. एवढेच नव्हे, तर या कचराभूमीला पर्यायी जागा शोधावी, अशीही मागणी करण्यात आली होती.

या कचराभूमीमुळे परिसरात मोठ्या प्रमाणावर वायुप्रदूषण असून कचऱ्याच्या दुरुगधीमुळे रहिवाशांना येथे जगणे कठीण होऊन बसले आहे. घनकचरा व्यवस्थापन नियमांचे पालन न करताच कचऱ्याची विल्हेवाट लावली जाते. त्यामुळे या परिसरातील हवा पूर्णपणे प्रदूषित झालेली आहे, असा दावाही याचिकाकर्त्यांतर्फे करण्यात आला होता. न्यायमूर्ती अभय ओक आणि न्यायमूर्ती पी. एन. देशमुख यांच्या खंडपीठाने मात्र मुळात ही याचिका जनहित याचिका होऊ शकत नाही, असे स्पष्ट करीत तिचे या रहिवाशांपुरत्याच मर्यादित याचिकेत रूपांतर केले.

# मुंबईत ४ फ्लॅट्सची किंमत २४० कोटी रुपये

**मुंबई–** मुंबईत घरांच्या किंमती गगनाला भिडल्या आहेत. या मायानगरीत आपलं आलिशान घर असावं अशी स्वप्नं अनेक श्रीमंतांची असतात. मुंबईमधील धनाढ्य कुटुंबापैकी एक असलेल्या तंवारिया कुटुंबानं नुकत्याच नेपिअन सी रोडवरील आलिशान टॉवरमध्ये तब्बल



२४० कोटी रुपये मोजून ४ सदनिका खरेदी केल्या आहेत. रिअल इस्टेटमधील काही सुत्रांनी दिलेल्या माहितीनुसार या कुटुंबानं नेपिअन सी रोडवरील 'द रेजिडेंस टॉवर'मधील २८ आणि ३१ व्या मजल्यावर चार सदनिका रुनवाल ग्रुपकडून खरेदी केल्या आहेत. गेल्या महिन्यात या सदनिका खरेदी करण्यात आल्या असल्याचं एका इंग्रजी वृत्तपत्राने म्हटलं आहे. या आलिशान सदनिकेतील प्रति चौरस फुटांसाठी या कुटुंबानं १.२ लाख एवढी रक्कम मोजली आहे. या चारही सदनिकांचा कार्पेट एरिया ४५०० चौरस फुट आहे. टॉवरमध्ये या कुटुंबानं स्वत:साठी २८ पार्किंग स्लॉटही विकत घेतले आहेत. हा टॉवर आलिशान किलाचंद हाउसच्या अगदी जवळच आहे. मुंबईतील घरांची किंमत दिवसेंदिवस वाढत आहे. रिअल इस्टेट व्यवसाय काहीसा मंदावला आहे त्यामुळे तंवारिया कुटुंबानं २४० कोटींची रक्कम मोजून विकत घेतलेल्या या व्यवहाराची चर्चा सगळीकडेच आहे.



# वरळी बीडीडी चाळ पुनर्विकासात परदेशी कंपन्यांमुळे विलंब?


**मुंबई- नायगाव आणि ना. म. जोशी मार्ग बीडीडी चाळींच्या पुनर्विकासासाठी निविदा जारी करणाऱ्या म्हाडाला वरळी येथील बीडीडी चाळ पुनर्विकासाबाबत तशी तत्परता दाखविता आलेली नाही. या पुनर्विकासात तांत्रिक मुद्द्यावर निविदा रद्द झाल्यामुळे उच्च न्यायालय आणि सर्वोच्च न्यायालयापर्यंत जावे लागलेल्या म्हाडाला आता तीन निविदाकारांमध्ये असलेल्या दोन चिनी आणि एका लेबेनीझ कंपनीमुळे सुरक्षाविषयक मंजुरीची केंद्रीय गृहखात्याकडून प्रतीक्षा आहे. दोन महिन्यांनंतरही अद्याप याबाबत म्हाडाला प्रतिसाद मिळालेला नाही.**

वरळी येथील ३२ एकर भूखंडावरील १२१ चाळींच्या पुनर्विकासाच्या या प्रकल्पात स्थानिक रहिवाशांनी अनेकदा खोडा घातला. त्यावर मात करीत म्हाडाने तीन वेळा लांबविलेली निविदा प्रक्रिया पार पाडली. मात्र संकेतस्थळाच्या तांत्रिक अडचणीमुळे आपल्याला निविदा सादर करता आली नाही, असा दावा करीत एस. डी. कॉर्पोरेशनने (शापूरजी पालनजी आणि दिलीप ठक्कर समूह) उच्च न्यायालयात धाव घेतली. उच्च न्यायालयात अनुकूल निर्णय आल्यानंतर चौथा निविदाकार म्हणून एस. डी. कॉर्पोरेशनचा समावेश म्हाडाने केला; परंतु त्याच वेळी म्हाडाने सर्वोच्च न्यायालयात आव्हान दिले. सर्वोच्च न्यायालयाने मात्र म्हाडाच्या बाजूने निकाल दिल्यानंतर एस. डी. कॉर्पोरेशन या स्पर्धेतून बाहेर गेले. उर्वरित तीन निविदाकारांमध्ये अरेबियन कन्स्ट्रक्शन कंपनी (लेबेनॉन), चायना इंजिनीअरिंग आणि सिटिक कन्स्ट्रक्शन कंपनी (दोन्ही चिनी) या परदेशी कंपन्यांचा समावेश आहे. या कंपन्यांच्या सुरक्षाविषयक मंजुरीसाठी केंद्रीय गृहमंत्रालयाला प्रस्ताव पाठविण्यात आला आहे. दोन-तीन महिन्यांपूर्वी हा प्रस्ताव पाठवूनही अद्याप उत्तर आलेले नाही. आता प्रस्ताव पाठविलेला असल्यामुळे त्याची प्रतीक्षा करणे आणि तोपर्यंत निविदा प्रक्रिया सुरू करता येणे शक्य नसल्याचे म्हाडातील एका अतिवरिष्ठ अधिकाऱ्याने नाव न छापण्याच्या अटीवर सांगितले.

# 'मॅग्नेटिक महाराष्ट्र'साठी वेळ आहे, विद्यापीठासाठी का नाही?

**मुंबई-** 'मॅग्नेटिक महाराष्ट्र'सारखा भव्य सोहळा आयोजित करण्यासाठी तुमच्याकडे वेळ आहे, परंतु महाराष्ट्र राष्ट्रीय विधी विद्यापीठासाठी जागा उपलब्ध करण्याबाबतचा निर्णय घ्यायला तुमच्याकडे वेळ नाही, अशा शब्दांत उच्च न्यायालयाने गुरूवारी राज्य सरकारच्या भूमिकेचा समाचार घेतला. या विद्यापीठासाठी जागा देण्याचा मुद्दा दीड वर्षांपासून प्रलंबित आहे. सरकारकडून केल्या जाणाऱ्या विलंबाचा आता संताप आल्याचे ताशेरेही न्यायालयाने ओढले. त्यामुळेच पुढला असा भव्य सोहळा आयोजित करण्यापूर्वी विद्यापीठाच्या जागेचा मुद्दा निकाली काढण्याचे न्यायालयाने सरकारला बजावले आहे.

ॲड्. प्रदीप हवनूर यांनी या संदर्भात केलेल्या याचिकेवरील सुनावणीच्या वेळी न्यायमूर्ती सत्यरंजन धर्माधिकारी आणि न्यायमूर्ती भारती डांगरे यांच्या खंडपीठासमोर सुनावणी झाली. त्या वेळी गेल्या दीड वर्षांपासून हा मुद्दा प्रलंबित का आहे हे समजू शकत नसल्याचे सांगत या विलंबाबाबत न्यायालयाने संताप व्यक्त केला. तसेच पुढील सुनावणीच्या वेळी न्यायालयात हजर राहण्याचे आदेश न्यायालयाने महसूल आणि वन विभागाच्या सचिवांना दिले आहेत. या विद्यापीठासाठी जागा देण्याची घोषणा सरकारने अगदी गाजावाजा करत केली. परंतु त्यानंतर जागा प्रत्यक्ष





बहाल करण्याबाबत काहीच केलेले नाही, असेही न्यायालयाने सुनावले.

त्याआधी गोराई येथील ६० एकर जागा या विद्यापीठासाठी बहाल करण्याबाबत सरकारने अध्यादेश काढण्यात आला. मात्र या जागेपैकी बहुतांशी भाग हा नंतर विमानतळ प्राधिकरणाला देण्यात आल्याची माहिती याचिकाकर्त्यांच्या वतीने न्यायालयाला देण्यात आली. त्यामुळे सरकार सध्या पर्यायी जागेच्या शोधात असल्याचेही न्यायालयाला सांगण्यात आले. या माहितीमुळे संतापलेल्या न्यायालयाने सरकारला धारेवर धरले. तसेच जागा विमानतळ प्राधिकरणाला देण्याचा निर्णय घेऊन सरकार विमान प्रवास करणाऱ्या नागरिकांच्या सुरक्षेशी खेळत असल्याचे ताशेरे न्यायालयाने ओढले.

# 'आर्थिक निकषावर आरक्षण देण्याचा प्रयत्न उधळून लावू'

**मुंबई-** या देशात जाती आहेत, तोपर्यंत जातीवर आधारित आरक्षण राहणार. दलित, आदिवासी, ओबीसींच्या आरक्षणाला धक्का लागू देणार नाही. आधी जातिव्यवस्था नष्ट करा, मग जातीआधारित आरक्षणाविरुद्ध बोला. सर्व आरक्षण आर्थिक निकषावर करण्याचा कोणी प्रयत्न केल्यास सर्व ताकदीनिशी तो हाणून पाडू. जाती नष्ट झाल्याशिवाय जातीआधारित आरक्षणाला धक्का लागू देणार नाही, अशी स्पष्ट भूमिका मांडत रिपब्लिकन पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष व केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री रामदास आठवले यांनी राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष शरद पवार यांच्या मताविरुद्ध शड्डू ठोकले आहेत. राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष शरद पवार यांनी मनसे प्रमुख राज ठाकरे यांनी घेतलेल्या मुलाखतीत या पुढील काळात आर्थिक निकषावर आरक्षण असावे, अशी भूमिका मांडली. त्यास आपला विरोध असल्याचे आठवले यांनी पत्रकाद्वारे जाहीर केले आहे. दलित, आदिवासी आणि ओबीसींच्या आरक्षणाला धक्का न लागता मराठा; लिंगायत; ब्राह्मण आदी सवर्ण समाजातील आर्थिक दुर्बलांना आर्थिक निकषावर आरक्षण देण्यात यावे. त्यासाठी आरक्षणाची ५० टक्के मर्यादा वाढवून ७५ टक्के करण्यात यावी. तसे झाल्यास सर्वांना आरक्षणाचा लाभ मिळून आरक्षणावरून होणारी भांडणे मिटतील असा दावा रामदास आठवले यांनी केला आहे.



# नीरव मोदी माझ्यासमोर आला तर त्याला चपलेने मारेन...!

**मुंबई-** पीएनबी बँकेला १३ हजार ४०० कोटींचा चुना लावून देशाबाहेर पळालेला नीरव मोदी जर माझ्यासमोर आला तर त्याला चपलेने मारेन अशी संतप्त प्रतिक्रिया नीरव मोदी यांच्या कंपनीत कामाला असलेल्या अर्जुन पाटील यांच्या पत्नी सुजाता पाटील यांनी प्रसारमाध्यमांसमोर दिली. नीरव मोदीने बँकांना चुना लावल्यामुळे २८०० पेक्षा जास्त कुटुंबे रस्त्यावर आली आहेत. त्याच्या पापाची फळे इथे कर्मचाऱ्यांना आणि त्यांच्या कुटुंबाला भोगावी लागत आहेत असाही आरोप सुजाता पाटील यांनी केला. आम्ही खूप साधीसुधी माणसे आहोत. माझे पती अर्जुन पाटील यांना या संपूर्ण प्रकरणात अडकवण्यात आले आहे. त्यांचा कोणत्याही गुन्ह्यात समावेश नाही. एका सामान्य माणसाला खूप वाईट पद्धतीने अडकवण्यात आले आहे. माझ्या नवऱ्याच्या केसालाही धक्का लागला तर याद राखा.. नीरव मोदी समोर आला तर त्याला चपलेने हाणेन तुम्ही सगळ्या चॅनल्सवर तो व्हिडिओ दाखवा. आमची झालेली बदनामी कोण भरुन देणार?

# नोटबंदीच्या धक्क्याने मनोविकाराची बाधा!

**मुंबई-** मायानगरी मुंबईत काम करून कुटुंबाचा उदरनिर्वाह करण्याच्या हेतूने सुमारे चार वर्षांपूर्वी तो नेपाळमधून भारतात आला. एकीकडे रात्रशाळेत शिक्षण घेत असताना दिवसा बुटपॉलिश करण्यापासून रुग्णसेवेपर्यंत मिळतील ती कामे करत त्याने दोन वर्षांत तब्बल ६० हजार रुपये साठवले. पण नोव्हेंबर २०१६च्या 'त्या' रात्री नोटबंदीची घोषणा झाली आणि काबाडकष्ट करून साठवलेले पैसे केवळ 'कागज के टुकडे' बनून गेले. या घटनेचा त्याच्या मनावर इतका प्रचंड आघात झाला की त्याचे मानसिक संतुलनच हरवून बसले.



८ नोव्हेंबर २०१६ रोजी पंतप्रधानांनी ५०० व एक हजार रुपयाच्या नोटा चलनातून बाद करण्याची घोषणा केल्यानंतर देशवासियांनी जे अनुभवले, त्या हालअपेष्टाही कमी वाटाव्यात अशी दारुण कहाणी मोहन (बदललेले नाव) या नेपाळी तरुणाच्या बाबतीत घडली. नेपाळमधील रामेछाप जिल्ह्यतील गोगनपानी येथे राहणाऱ्या मोहनला कुटुंबाचे उदरभरण करण्यासाठी मुंबई खुणावत होती. सिलिगुडी, काकाडविट्टा, कोलकत्ता असा प्रवास करत करत तो मुंबईत आला. मुंबईत राबणाऱ्या प्रत्येक हाताला काम मिळते, असं म्हणतात. पण मोहनची तशी तयारी असतानाही त्याला कामच मिळत नव्हते. मिळेल त्या ठिकाणी खायचे, झोपायचे असे करत करतच त्याने सुरुवातीला मुंबईत अनेक दिवस ढकलले. एकेदिवशी माटुंगा परिसरात भटकत असताना तेथील डॉन बॉस्को संस्थेच्या कर्मचाऱ्यांनी त्याची विचारपूस केली. त्यांनी त्याला वांद्रे येथील सेंडेरोस या रात्रशाळेत प्रवेश मिळवून दिला.

# ४९० मुंबईकर रस्ते अपघाताचे बळी



**मुंबई-** देशाची अर्थिक राजधानी असलेल्या मुंबई शहरात दिवसेंदिवस रस्ते अपघातांच्या संख्येत मोठ्या प्रमाणात वाढ होत आहे. त्यानुसार २०१७ मध्ये मुंबई शहर आणि उपनगरात एकूण ४९० लोकांचा रस्ते अपघातात मृत्यू झाला असून २०१६च्या तुलनेत हा आकडा ५ टक्क्यांनी वाढला आहे.

मुंबई शहरात गेल्या काही वर्षांत मोठ्या प्रमाणात वाहनांची संख्या वाढली आहे. अनेकदा वाहनचालकांच्या चुकीमुळे अथवा रस्त्यांवरील खड्डे आणि इतर कारणांमुळे काही निष्पाप लोकांना आपला जीव गमवावा लागत आहे. माहिती अधिकार कार्यकर्ता शकील अहमद शेख यांनी मुंबई वाहतूक पोलीस विभागाकडे १ जानेवारी २०१७ पासून डिसेंबर २०१७ पर्यंत मुंबईतील रस्ते अपघातांमध्ये किती लोकांचा मृत्यू झाला, तसेच खराब रस्ते, खड्डे आणि चुकीच्या नियमांमुळे किती जणांचे बळी गेले. त्यावर प्रशासनाने काय कारवाई किंवा बदल केले आहेत. याबाबत माहिती अधिकारातून माहिती विचारली होती.

त्यांना मिळालेल्या माहितीमध्ये १ जानेवारी ते ३१ डिसेंबर २०१७ पर्यंत मुंबई शहर आणि उपनगरात झालेल्या अपघातांमध्ये ४९० लोकांचा बळी गेल्याची माहिती त्यांना वाहतूक विभागाने दिली आहे. मात्र खराब रस्ते, खड्डे आणि चुकीच्या नियमांमुळे किती जणांचे बळी गेले आहेत, यावर वाहतूक विभागाने त्यांना काहीही माहिती दिलेली नाही. वाहतूक विभाग अभिलेखावर ही माहिती जतन केली जात नसल्याचे त्यांना माहिती अधिकारात सांगण्यात आले आहे.

# संपादकीय... कर्जबुडवे



संपादकः- दिपक मोरेश्वर नाईक

**हेतूपुरस्पर कर्ज बुडवणारे बडे भांडवलदार बँकांचे एक लाख कोटी रुपये देणे असल्याची माहिती धक्कादायक असून भांडवलदारी जगताचा भेसूर चेहरा त्यानिमित्ताने समोर आला आहे. कर्ज काढणे हे कमीपणाचे आणि ते नाइलाजास्तव काढावे लागले तर परतफेड करण्याची क्षमता गमावणे हे जगण्यापुढचे संकट वाटणारा मोठा वर्ग देशामध्ये आहे. अशा हजारो शेतक्ऱ्यांनी गेल्या काही वर्षात आपले जीवन संपवले आहे. काही हजारांचे कर्ज काढल्यानंतर नैसर्गिक आपत्तीमुळे पीक वाया जाते आणि शेतकरी मुदतीत परतफेड करण्यास असमर्थ ठरतो. अशावेळी बँकेकडून वसुलीची साधी नोटिस आली तरी सैरभैर होऊन जीवन संपवल्याच्या शेकडो काळीजकहाण्या महाराष्ट्राने आणि देशानेही वाचल्या, ऐकल्या आहेत. एकीकडे इभ्रतीला जपणारा असा संवेदनशील वर्ग आणि दुसरीकडे बँकेचे कर्ज बुडवण्यासाठीच असते अशी धारणा असलेला उद्योजक, व्यावसायिक वर्ग पाहायला मिळतो. ही मंडळी बँकांना कशी राजरोसपणे गंडा घालतात, हेच दिसून येते. सरकारचे आणि बँकांचे धोरण उद्योजक आणि व्यावसायिकांना मैत्रीपूर्ण राहावे, यासाठी सातत्याने प्रयत्न केले जातात. उद्योगवाढीसाठी आणि त्यातून पर्यायाने रोजगारनिर्मिती व्हावी म्हणून अशा बाबींना प्रोत्साहन देण्याबाबत कुणाची हरकत असण्याचे कारण नाही. परंतु बँकांचे यासंदर्भातील धोरण विषमतामूलक असते. जो सामान्य माणूस गरजेसाठी छोट्या कर्जाचा अर्ज घेऊन जातो त्याला बँकांमध्ये तुच्छतेची वागणूक दिली जाते. काही बँक अधिकारी तर अशा गरजवंतांना भिकाऱ्यासारखे वागवत असतात. जो सामान्य माणूस कर्जाची पै न् पै परतफेड करणार असतो त्याला अवमानास्पद वागणूक मिळत असताना बड्या कर्जदारांसाठी मात्र पायघड्या घालत असतात. त्यांच्या अनियमिततांकडे दुर्लक्ष केले जाते. बँकांची फसवणूक होण्यामागे अधिका०ऱ्यांची ही मानसिकताही कारणीभूत आहे. माणूस जेवढा मोठा किंवा कर्जाचा आकडा जेवढा मोठा तेवढी जोखीम मोठी असते त्यामुळे त्यासंदर्भात अविश्वासाची भावनाही तेवढीच असायला पाहिजे. परंतु घडते उलटेच आणि बँक अधिकारी अशांच्याकडे काणाडोळा करतात आणि त्यातून मग पुढचे सगळे महाभारत घडत असते. किंगफिशर एअरलाइन्सचे विजय मल्ल्या तीन हजार कोटींहून अधिक रकमेचा गंडा घालून परदेशात गेल्यानंतर अशा कर्जबुडव्यांची चर्चा सुरू झाली. ही चर्चा आर्थिक अंगाने होऊन काही धोरणात्मक सुधारणांच्या दिशेने गेली असती तर संकटातून संधी दिसली असती. परंतु कितीही गंभीर प्रश्नाचे राजकारण करण्यात आपण पटाईत असल्यामुळे मल्ल्याला कर्ज कुणाच्या काळात दिले आणि तो पळून कुणाच्या काळात गेला, याचीच चर्चा करीत राहिलो. दरम्यानच्या काळात नीरव मोदी अकरा हजार कोटी रुपयांचा घोटाळा करून फरार झाला. सामान्य माणसाला जे आकडे सहजासहजी निदीष लिहिता येणार नाहीत, एवढ्या मोठ्या रकमेच्या घोटाळ्यांमुळे बँकिंग व्यवस्थेवरचा विश्वास डळमळीत होऊ लागला आहे. या पार्श्वभूमीवर हेतूपुरस्पर कर्जबुडव्यांची जी आकडेवारी पुढे आली आहे, ती चिंता वाढवणारी आहे. देशात हजारो उद्योजक, व्यावसायिक आहेत आणि त्यातील बहुतांश लोक प्रामाणिकपणे उद्योग, व्यवसाय करतात. परंतु काही मोजक्या लोकांमुळे सगळ्यांचीच बदनामी होते. विजय मल्ल्या, नीरव मोदीच्या रांगेतली आणखी काही नावे समोर आली आहेत. विन्सम डायमंड्सचा प्रवर्तक जतीन मेहता हा सर्वात मोठा देणेकरी असून तो ५४६६ कोटी रुपये देणे असल्याची माहिती समोर आली आहे. विजय मल्ल्यापेक्षा हा मोठा मासा आहे. आरइआय अॅग्रोचा संदीप झुनझुनवाला २७३० कोटी, महुआ मीडियाचा पी. के. तिवारी २४१६ कोटी आणि झूम डेव्हलपर्स २३७१ कोटी असे हे मोठे देणेकरी आहेत. बँकिंग व्यवहारातील चिंताजनक बाब म्हणजे आकस्मिक आलेल्या संकटामुळे एखाद्याचा उद्योग बुडाला, आर्थिक संकट आले त्यामुळे कर्ज थकले तर समजू शकते. परंतु कोणतेही कारण नसताना कोट्यवधींचे कर्ज थकवायचे आणि व्यवसायासाठी घेतलेल्या कर्जाची रक्कम व्यक्तिगत संपत्ती वाढवण्यासाठी, अलिशान जगण्यासाठी वापरण्याची प्रवृत्ती वाढत चालली आहे. विजय मल्ल्या, नीरव मोदी यांना त्यातले अग्रदूत म्हणता येईल. अशांवर कायदेशीर कारवाईचा कठोर बडगा पडायला पाहिजे आणि उर्वरित आयुष्य तुरुंगात सडले पाहिजे, तरच या बुडवणुकीला आळा बसेल आणि सामान्य माणसांचा बँकांवरचा विश्वास टिकून राहील.**

# जग हे 'बंदी'शाळा..

फेसबुक ही जगातील अत्यंत दुष्ट आणि पापी कंपनी आहे असे विधान पेटीएम या कंपनीचे प्रवर्तक विजय शेखर शर्मा यांनी गतसप्ताहात केले. हे शर्मा फेसबुकवर रागावले याचे कारण या कंपनीच्या मालकीच्या व्हॉट्सअॅप या लोकप्रिय संदेशवहन व्यवस्थेतर्फे लवकरच भारतात आर्थिक व्यवहार सुरू केले जाणार आहेत. ही नवी सेवा सुरू झाल्यावर शर्मा यांच्या पेटीएमला तगडी स्पर्धा होणार हे उघड आहे. तेव्हा त्यामुळे या नव्या सेवेवर बंदीच घालायला हवी, निदान तिला रोखायला हवे, असे या शर्मा यांचे म्हणणे. ऑटो रिक्षा सुरू झाल्यावर टांगेवाले रडतात आणि टॅक्सी सेवा सुरू झाल्यावर रिक्षावाले पोटावर पाय येतो म्हणून गळा काढू लागतात. पुढे उबरसारखी सेवा आल्यावर कालपर्यंत मिजास मारणारे टॅक्सीवाले अन्याय होत असल्याचे रडगाणे गाऊ लागतात. तसेच शर्मा यांचे झाले आहे. पेटीएम ही भारतीयांसाठी महत्त्वाची सेवा आहे असे ते मानतात आणि व्हॉट्सअॅपसारख्यांना सरकारने थारा देऊ नये असे ते सुचवतात. यापरता दुसरा विनोद नाही. मुदलात फेसबुक ही पापी कंपनी असेल तर पेटीएम ही काही पुण्यवान संतसज्जनांतर्फे दिली जाणारी सेवा आहे असे निश्चितच कोणी मानणार नाही. हे पेटीएमचे जनक शर्मा, उदय कोटक यांच्यासारखे बँकर्स, अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प आणि अर्थातच आपले मायबाप सरकार अशा अनेकांना अचानक स्वदेशीचा पुळका आला आहे. तो का, हा मुद्दा या निमित्ताने समजून घेणे आवश्यक ठरते.



त्याची सुरुवात आपल्या ताज्या अर्थसंकल्पाने करावयास हवी. या अर्थसंकल्पात ५० विविध घटकांवरील आयात शुल्क वाढवण्यात आले. त्याच्या आधी गतवर्षाच्या अखेरीस केंद्र सरकारने २० परदेशी वस्तूंवरील जकातीत वाढ केली. पाठोपाठ पुन्हा अर्थसंकल्पात असाच निर्णय घेतला गेला. मेक इन इंडिया या मोहिमेस बळकटी यावी म्हणून हे केले गेले, असा सरकारचा युक्तिवाद. त्याची मीमांसा करू गेल्यास तो अत्यंत पोकळ ठरतो. याचे कारण परदेशी वस्तूंचे येणे थांबले म्हणून देशी वस्तूंची गुणवत्ता सुधारते असे अजिबातच नाही. प्रत्यक्षात हे उलट असते. परदेशी वस्तूंची स्पर्धा नसेल तर देशी उत्पादक आपल्या आहे त्या गुणवत्तेवरच व्यवसाय करीत राहतात आणि भारतीयांना दुय्यमांतच निवड करावी लागते. उद्योग असो वा व्यक्ती. अतिसुरक्षित वातावरणात त्यांची वाढ थांबतेच थांबते. ते सुस्त होतात. १९९१ च्या आधी आपल्याकडील अवस्था आठवून पाहिल्यास हे समजेल. त्यामुळे या आयात शुल्कवाढीमुळे देशी उत्पादकांना बरकत येते ही विचारधाराच कालबाह्य आहे. अर्थसंकल्पात तिचा प्रत्यय आला. बरे, आयात शुल्क वाढवलेल्या वस्तूंच्या यादीत फक्त उच्च तांत्रिक क्षमता असलेल्यांचा समावेश आहे म्हणावे तर तसेही नाही. फळांच्या रसांवरील आयात शुल्कातही आपल्या सरकारने वाढ केली आहे. परदेशी फळरसांच्या किमती वाढवल्याने कोणाचे भले होणार आहे याचा अंदाज बांधणे अवघड नाही. परंतु हे सर्व मेक इन इंडियासाठी केले जाते, ही शुद्ध लोणकढी आहे. अर्थात अलीकडच्या काळात सरकारी लोणकढय़ा शिरसावंद्य मानणाऱ्यांची संख्या मुबलक वाढल्याने ही बाबही खपून जाईल, हा भाग वेगळा. परंतु याच सरकारने नेमलेल्या निती आयोगाने अवघ्या सहाच महिन्यांपूर्वी सर्व आयात मालांवरील शुल्क सरसकट ७ टक्के इतक्या समान दराने आकारावी असा सल्ला सरकारला दिला होता. पण सरकारकडून त्याकडेही दुर्लक्ष केले गेले आणि देशी उद्योजकांसाठी हे असले 'बाहेरचे नको' धोरण अमलात आणले गेले.

त्याबरोबर तिकडून अमेरिकेतून अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प कडाडले यात नवल नाही. भारत सरकारच्या या संरक्षणवादी मनोवृत्तीवर या ट्रम्प यांनी टीका केली आणि परदेशी मालावरील शुल्क कमी न केल्यास जशास तसे उत्तर देण्याचा इशारा दिला. सुरुवातीला त्यांचा मुद्दा हार्ले डेव्हिडसन या श्रीमंती दुचाकींपुरताच होता. पण या निमित्ताने भारत-अमेरिका व्यापारी संबंधांचेही वास्तव समोर आले. अमेरिकेतून भारतात येणाऱ्या वस्तूंवर अधिक कर लावून त्या महाग केल्या गेल्या तर भारतातून अमेरिकी बाजारपेठेत जाणाऱ्या वस्तूंनाही तशीच वागणूक दिली जाईल आणि त्यांच्याही किमती वाढतील असे पाहिले जाईल, असा ट्रम्प यांच्या इशाऱ्याचा अथ. तो योग्य आहे. याचे कारण जागतिकीकरणाच्या काळात देशोदेशांतील व्यापार-उदिमास गती यावी यासाठी सरकारांचे प्रयत्न असताना आपण मात्र घडय़ाळाचे काटे उलटे करू लागलो आहोत. ट्रम्प यांच्या इशाऱ्यानंतर या दुचाकींवर ७५ टक्के असलेले आयातशुल्क ५० टक्क्यांपर्यंत कमी करण्याचा निर्णय सरकारला घ्यावा लागला. त्यानंतरही ट्रम्प समाधानी नाहीत. त्यांना हा शून्य टक्के इतकाच हवा आहे. अन्यथा भारतातून अमेरिकेत येणाऱ्या उत्पादनांवरही आपण भारताइतकाच कर लावू असा त्यांचा इशारा आहे. त्यातून आपण बाहेर पडायच्या आत ट्रम्प यांनी एच १बी व्हिसांवर निर्बंध आणले असून त्यामुळे अमेरिकेच्छुक भारतीयांसाठी परिस्थिती अधिकच अवघड होणार आहे. स्थलांतर न करणाऱ्या पण दीर्घकालासाठी अमेरिकेत राहू इच्छिणाऱ्यांना हा व्हिसा घ्यावा लागतो. त्याचा जन्म फक्त अत्यंत उच्च गुणवत्ताधारक अमेरिकेत यावेत यासाठी केला गेला. परंतु अलीकडच्या काळात त्याचा उपयोग आपल्या माहिती तंत्रज्ञान कंपन्यांकडूनच अधिक झाला. या कंपन्यांनी प्रचंड संख्येने भारतीय तरुणांना अमेरिकेत पोटास लावले. हे ट्रम्प यांना मंजूर नाही. त्यामुळे आपल्या अभियंत्यांना अमेरिकेत पाठवू पाहणाऱ्या कंपन्यांना हे आपले कर्मचारी काही विशेष गुणवत्ताधारी आहेत असे सिद्ध करावे लागेल. ते तसे नाहीत आणि नसतात हे वास्तव असल्याने या कंपन्यांना अमेरिकी कामे मिळवणे या निर्णयामुळे अवघड जाईल. वर्षाला अमेरिका साधारण ६५ हजार इतके एच१बी व्हिसा देते. त्यातील ४० हजार वा अधिक हे भारतीय तरुणांच्या पदरात पडतात. आता इतक्या मोठय़ा संख्येने ही खिरापत वाटणे या कंपन्यांना शक्य होणारे नाही. तसेच अमेरिकी कंपन्या स्वतंत्रपणे भारतातून ही जी खोगीरभरती करतात तिलाही चाप बसेल. कारण हे नवे नियम अमेरिकी कंपन्यांनाही लागू करण्यात आले आहेत. आपण सेवेत ज्याला घेऊ इच्छितो त्या भारतीयाकडे काही विशेष अऱ्हता आहे असे अमेरिकी कंपन्यांनाही दाखवून द्यावे लागेल. ट्रम्प सत्तेवर आल्यानंतर व्हिसा अर्ज नाकारले जाण्याच्या घटनांत आधीच २७ टक्के इतकी वाढ झाली आहे. त्यात आता हे निर्णय. तेव्हा आपले भारतीय सरकार असो की ट्रम्प किंवा विजय शेखर शर्मा. या तिघांना जोडणारा एकच समान धागा आहे. तो म्हणजे वाढता संकुचित वाद. दोन वर्षांपूर्वी पोलिश मजूर मोठय़ा प्रमाणावर येतात या एका कारणावर युरोपमध्ये ब्रेग्झिट घडले. त्यानंतर अमेरिकेत ट्रम्प यांच्या उदयामुळे त्याच संकुचिततावादास खतपाणी मिळाले. ऐतिहासिक अशा जागतिकीकरणाचे चक्र उलटे फिरवण्याचाच हा प्रकार. आता तो अनेक देशांत घडताना दिसतो. दावोस येथील वार्षिक अर्थकुंभात जागतिकीकरणाचे गोडवे गायचे आणि मायदेशात स्वदेशीचा बुक्का लावायचा असे हे दुहेरी लोकप्रियतेचे राजकारण. सुज्ञांनी ते समजून घ्यायला हवे. नपेक्षा आपले जग हे 'बंदी'शाळा बनेल.

# पोलीस ठाण्यातील अभ्यागतांची डिजिटल नोंद

**ठाणे- पोलीस ठाण्यात नागरिकांना आपल्या कामासाठी अनेकदा चकरा माराव्या लागतात. रिकाम्या हाताने परतावे लागते, शिवाय पोलीस कर्मचाऱ्यांच्या उद्धट वर्तनाला सामोरे जावे लागते. मात्र पालघरच्या पोलीस अधीक्षकांनी विशेष अॅप तयार केले असून आलेल्या प्रत्येक अभ्यागताची नोंद या अॅपमध्ये केली जाणार आहे. त्याची माहिती मुख्यालयातील पोलीस अधीक्षकांना मिळणार आहे.**

पालघर जिल्ह्यातील पोलिसांवर लक्ष ठेवण्यासाठी पोलीस अधीक्षक मंजुनाथ सिंगे यांनी 'थर्ड आय' नावाचे अॅप पोलिसांच्या भ्रमणध्वनीत टाकले आहे. यामुळे पोलिसांच्या प्रत्येक हालचाली नोंदवल्या जात असून त्याची माहिती अधीक्षकांना मिळत आहे. त्याच्या पुढे जाऊन आता नागरिकांच्या सोयीसाठी 'व्हिजिटर मॅनेजमेंट सिस्टीम' अर्थात अभ्यागत व्यवस्थापन यंत्रणा ही कार्यप्रणाली विकसित केली आहे. पोलीस ठाण्यात येणाऱ्या प्रत्येक अभ्यागताची व्हिजिटर्स नोंद या अॅपमध्ये केली जाणार आहे. ही नोंद होताच तात्काळ त्या अभ्यागताच्या भ्रमणध्वनीवर एक ऑनलाइन पावती येईल. त्यात एक फिडबॅक अर्जही प्रतिसाद अर्ज असेल. अभ्यागतांना पोलीस ठाण्यात कशी वागणूक मिळाली, कर्मचारी कसे वागले, कामावर समाधान आहे का त्याची माहिती या फिडबॅकद्वारे देता येणार आहे. हे अॅप मुख्यालयातील अधीक्षकांच्या संगणकाशी जोडले आहे. त्यामुळे प्रत्येक पोलीस ठाण्यात किती अभ्यागत आले ते त्यांना समजणार आहे. पोलीस ठाण्यात किती तक्रारदार आले याच्या नियोजनाबरोबर ही यंत्रणा अनेक दृष्टीने फायदेशीर ठरणार आहे.



ही यंत्रणा आम्ही जिल्ह्याच्या २३ पोलीस ठाणी आणि इतर शाखेत कार्यान्वित केली आहे.

## आठ वर्षाच्या कन्येवर बलात्कार करणा-या पित्यास अटक आईनेच केली पोलिसात तक्रार

**पालघर-** सफाळे जवळील पेनंद येथील ८ वर्षीय आपल्याच मुली बरोबर जबरदस्तीने शारीरिक संबंध प्रस्थापित करणाङ्या नराधम बापाच्या मुसक्या सफाळे पोलिसांनी आवळल्या असून पालघर न्यायालयाने त्याला दिवसाची पोलीस कोठडी सुनावली आहे.



सफाळे जवळील आदिवासी समाजातील एक ४५ वर्षीय इसम आपली पत्नी, एक मुलगा, एक मुलगी यांच्यासोबत रहात होता. पावसाळी शेतीची कामे संपल्यानंतर हाती कुठलाही व्यवसाय नसल्याने त्याला दारूचे व्यसन लागले होते. घराचा चरितार्थ चालावा म्हणून त्याची पत्नी आपल्या परिसरातून पाने, भाजीपाला मुंबई येथे विक्री करण्यास जात असे. याचा गैरफायदा घेऊन आरोपी आपल्या मुलीवर अत्याचार करीत होता. याची माहिती कुणाला सांगितल्यास मारहाणीचा धमकी देत असे.



## ठाण्यावर कचरा संकट!

**ठाणे-** स्वच्छता सर्वेक्षणात ठाणे शहराला वरचा क्रमांक मिळावा, यासाठी गेले महिना दीड महिने काटेकोरपणे काम करणाऱ्या घंटागाडी कामगारांनी काम बंद केले आहे. ठेकेदारांच्या जाचाला कंटाळून कामगार संपावर गेले असून ठाण्यातील अनेक भागांचा कचरा उचलण्यात आला नव्हता. मात्र, शुक्रवारीदेखील हा संप सुरूच राहिल्यास याहून बिकट परिस्थिती निर्माण होण्याची शक्यता आहे. घंटागाडी कामगारांनी पुकारलेल्या कामबंद आंदोलनामुळे ठाणे महानगरपालिकेतर्फे गाजावाजा करीत राबवल्या जाणाऱ्या स्वच्छ ठाणे मोहिमेवर प्रश्नचिन्ह उभे राहिले आहे. ठेकेदार एम. कुमार यांच्या अरेरावीविरोधात पुकारण्यात आलेल्या या आंदोलनामुळे वर्तकनगर, वागळे, माजिवडा आणि मानपाडा प्रभाग समितीत एकही घंटागाडी फिरकली नसल्याने येथील रहिवाशांची चांगलीच गैरसोय झाली. ठेकेदारांच्या देखभालीअंतर्गत चालवल्या जाणाऱ्या घंटागाडी कर्मचाऱ्यांना वेळच्या वेळी पगार दिला जात नाही. या संदर्भात कर्मचाऱ्यांच्या संघटनांनी वारंवार महापालिका प्रशासनाकडे दाद मागितली. मात्र तरीही त्यांना न्याय मिळाला नाही. त्यामुळे अखेर या कर्मचाऱ्यांनी काम बंद आंदोलन पुकारले आहे. जोपर्यंत आमच्या मागण्या मान्य केल्या जात नाहीत, तोपर्यंत हे आंदोलन मागे घेतले जाणार नसल्याचा इशारा या कामगारांनी दिला आहे. विविध प्रकारची थकबाकी, पुढील तीन वर्षांच्या कपड्यांचे आधीच पैसे कापणे, पगार कपात या जाचाला कंटाळून कर्मचाऱ्यांनी काम बंद करण्याचा निर्णय घेतला आहे.

## महावितरणचे कार्यालय निर्जनस्थळी

**वसई-** वसई पश्चिमेच्या अंबाडी रोडवरील महावितरणाचे उपविभागीय कार्यालय हलवून थेट सनसिटीच्या निर्जनस्थळी हलवण्यात आले आहे. या ठिकाणी ना चांगला रस्ता आहे, ना वाहतुकीची कोणती सोय आहे. त्यामुळे शेकडो वीज ग्राहकांची मोठी गैरसोय होत आहे. महावितरणाचे वसई शहरासाठी दोन उपविभाग आहेत. त्यांपैकी एक नालासोपाऱ्यात आणि दुसरा विरारमध्ये आहे. वसई पश्चिमेच्या अंबाडी रोड येथील हिरा निकेतन इमारतीत एक उपविभागीय कार्यालय आहे. या विभागाच्या अंतर्गत



वसई गाव, वसई शहर पूर्व आणि पश्चिम आणि वाडा येथील कारभार चालतो. वसई विभागात अडीच लाख वीज ग्राहकांचा समावेश होतो. गेल्या अनेक वर्षांपासून हिरा निकेतन इमारतीत हे उपविभागीय कार्यालय होते, परंतु आता ते तेथून हलवून वसई पश्चिमेच्या सनसिटी येथे हलवण्यात आले आहे. त्यामुळे सर्वसामान्य वीज ग्राहकांची मोठी गैरसोय होत आहे. मुळात सनसिटी हे ठिकाणी शहरापासून लांब निर्जन ठिकाणी आहे. तेथे रिक्षा जात नाही. स्पेशल रिक्षा करून जावे लागते. त्यासाठी एका फेरीसाठी ४० ते ५० रुपये खर्च होते.

## उल्हास नदी विषारी



**उल्हासनगर-** ठाणे जिल्ह्यातील अनेक महापालिकांसह कल्याण तालुक्यातील गावांना पाणीपुरवठा करणाऱ्या उल्हास नदीचे पाणी दिवसेंदिवस विषारी बनू लागले असून मंगळवारी बदलापुरात या नदीच्या किनाऱ्यावर हजारो मासे मृतावस्थेत आढळून आले. नजीकच्या औद्योगिक वसाहतीतून थेट सोडण्यात येणाऱ्या रासायनिक सांडपाण्यामुळे उल्हास नदीच्या पाण्यावर काळा तवंग पसरला असून त्यामुळेच मासे मृत्युमुखी पडल्याचा आरोप नागरिकांनी केला आहे. उल्हास नदी ही ठाणे जिल्ह्यातील अनेक महापालिकांचा मुख्य जलस्रोत आहे. या नदीच्या प्रदबषणाचा मुद्दा आजवर अनेकदा उजेडात आला आहे. काही दिवसांपूर्वीच न्यायालयाने उल्हास नदीच्या प्रदूषणाबाबत स्थानिक स्वराज्य संस्थांना भरमसाट दंडही आकारला होता व प्रदूषणाबाबत उपाययोजना राबवण्याची तंबी दिली होती. मात्र अजूनही या नदीचे प्रदूषण सुरूच आहे. बदलापुरातील औद्योगिक वसाहतीतील रासायनिक सांडपाणी कोणतीही प्रक्रिया न करता थेट नदीपात्रात सोडण्यात येते. मंगळवारीही असाच प्रकार दिसून आला असून सांडपाण्यामुळे नदीच्या पाण्यावर काळा तवंग निर्माण झाला आहे. तसेच या विषारी द्रव्यामुळे नदीकिनारी शेकडो मासे मृतावस्थेत पडल्याचे दिसून आले. बदलापूर चौपाटी ते सोनिवली, एरंजाड आणि वालिवली गावांच्या किनाऱ्यावर या माशांचा खच स्पष्टपणे दिसून येत होता.

## पालिका कर्मचारी, पोलिसांवर दगडफेक
### वसईतील ५०० अनधिकृत चाळींवर हातोडा

**वसई-** वसई पूर्वेकडील राजावली भोयदापाडा परिसरात असलेल्या शेकडो अनधिकृत बांधकामांवर महापालिका प्रशासनाने गुरुवारी कारवाई सुरू केली. या कारवाईला येथील रहिवाशांनी तीव्र विरोध करत पालिका कर्मचारी आणि बंदोबस्तासाठी असलेल्या पोलिसांवर जोरदार दगडफेक केली. पोलीस आणि पालिकेची वाहने आणि जेसीबीची जाळपोळही करण्यात आली. वसई-विरार शहर महापालिकेने सध्या अनधिकृत बांधकामांवर हातोडा मारण्याची मोहीम हाती घेतली असून सध्या बेकायदा चाळींना लक्ष्य केले आहे. गुरुवारी सकाळपासूनच राजावली भोयदापाडा पालिकेची तोड कारवाई सुरू होती. याठिकाणी असलेल्या ५०० बेकायदा चाळी यावेळी



जमीनदोस्त करण्यात आल्या. या कारवाईला विरोध दर्शवत भूमाफियांनी आणि रहिवाशांनी सायंकाळी चारच्या दरम्यान थेट पालिका पथकावरच, पोलिसांवर तुफान दगडफेक केली. यावेळी बंदोबस्तासाठी असलेल्या पोलिसांकडून लाठीमारही करण्यात आला. पोलिसांनी वेळीच हस्तक्षेप करून परिस्थिती नियंत्रणात आणण्याचा प्रयत्न केला, परंतु मोठा जमाव समोर उभा राहिल्याने परिस्थिती आणखी बिकट होत गेली. त्यातच या जमावाने केवळ दगडफेक केली नसून कारवाईसाठी असलेल्या दोन जेसीबी, पोलिसांच्या गाड्या, महापालिकेच्या गाड्यांची मोठ्या प्रमाणावर मोडतोड करून काही वाहनांची जाळपोळही केली.


## डोंबिवलीत २० कोटींचा 'टीडीआर' घोटाळा

**डोंबिवली-** डोंबिवली पश्चिमेत देवीचापाडा भागात साडेआठ एकर सरकारी गुरचरण जमीन आहे. या जमिनीच्या कागदपत्रांवर खाडाखोड करून स्वत:ची नावे चढवून एका व्यावसायिकाने २० कोटीचा 'टीडीआर' हस्तांतरणीय विकास हक्क घोटाळा केला आहे. महसूल विभागाने या प्रकरणाची चौकशी करून संबंधित व्यावसायिकाने खाडाखोड करून तयार केलेले सात बारा उतारे रद्द केले आहेत. या जमिनीवर पालिकेची आरक्षणे असल्याने पालिका प्रशासनाने या प्रकरणी कठोर भूमिका घ्यावी, अशी मागणी मनसेचे नगरसेवक प्रकाश भोईर यांनी सर्वसाधारण सभेत केली. लक्षवेधी सूचनेद्वारे प्रकाश भोईर यांनी हा विषय प्रशासनाच्या निदर्शनास आणला. डोंबिवली पश्चिमेत देवीचापाडा भागात साडे आठ एकर सरकारी गुरचरण जमीन आहे. या जमिनीच्या सात बारा उतारा व अन्य दस्तऐवजांमध्ये खाडाखोड करून संबंधितांनी सदर जमीन मालकी हक्काची दाखवून या जागेचा १८ हजार चौरस मीटरचा 'टीडीआर' घेतला आहे. आठ वर्षांपासून महसूल विभागाकडे या विषयी पाठपुरावा करीत होतो. त्या पाठपुराव्याला यश आले असून, लोकायुक्त, अप्पर जिल्हाधिकारी, तहसीलदार यांनी या प्रकरणाची चौकशी करून सरकारी जमिनीवर संबंधितांनी घोटाळा केलेल्या अहवालांमध्ये स्पष्ट केले आहे, असे नगरसेवक भोईर यांनी सांगितले. अप्पर जिल्हाधिकाऱ्यांसमोर या प्रकरणी सुनावणी होऊन संबंधित जमिनीवरील बनावट सात बारा उतारे रद्द करण्याचे आदेश दिले आहेत. गुरचरण जमिनीवर कल्याण डोंबिवली पालिकेची पाच विविध प्रकारची आरक्षणे आहेत.



# ऐतिहासिक मुलाखतीनंतर शरद पवारांची काळजी वाटते

**मुंबई-** मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांनी दोन दिवसांपूर्वीच राष्ट्रवादीचे सर्वेसर्वा आणि देशाचे माजी केंद्रीय कृषीमंत्री शरद पवार यांची एक मुलाखत घेतली. सोशल मीडिया असो किंवा इतर कोणतेही माध्यम या मुलाखतीवरून सध्या अनेक प्रतिक्रिया उमटत आहेत. शिवसेना यात मागे कशी राहिल? शरद पवार हे बेरजेचे राजकारण करतात मात्र गेली काही वर्षे त्यांचे गणित चुकते आहे. त्यांच्या बेरजा-वजाबाक्यांची उजळणी पुन्हा घ्यावी लागेल. ऐतिहासिक मुलाखतीमुळे शरद पवार इतिहास जमा तर होणार नाहीत ना? अशी काळजी आम्हाला वाटते म्हणत शिवसेना पक्ष प्रमुख उद्धव ठाकरे यांनी या मुलाखतीवर शरसंधान केले आहे. सामना या शिवसेनेच्या मुखपत्रातून शरद पवारांवर टीका करण्यात आली आहे. नुकत्याच पुण्यात झालेल्या मुलाखतीत शरद पवारांनी एक ऐतिहासिक भूमिका मांडली. त्यांनी सांगितले की, जातीपातीचे राजकारण मान्य नाही. जाती पातीवर आधारीत आरक्षण नीती मोडून काढली पाहिजे. आज विविध समाज घटकांकडून आरक्षणासाठी आंदोलने होत असली तरीही जातीच्या निकषावर नव्हे तर आर्थिक निकषावर आरक्षण द्यायला हवे. पवार यांनी मांडलेली भूमिका फक्त टाळ्या मिळवण्यासाठी असावी. या भूमिकेवर त्यांना टाळ्या मिळण्याची शक्यता नाही. टाळी देण्यासाठी जो दुसरा हात लागतो तो त्यांच्या आसपासही दिसला नाही. कारण स्वतः शरद पवार हे देशातले ज्येष्ठ नेते असले तरीही राजकारणातील त्यांच्या भूमिकांना स्थैर्य मिळालेले नाही.



# नवी मुंबई मेट्रो मे २०१९ पर्यंत ट्रॅकवर

**खारघर-** सिडकोचा महत्त्वाकांक्षी प्रकल्प समजल्या जाणाऱ्या नवी मुंबई मेट्रो प्रकल्पातील विलंब झालेल्या स्थानकाची कामे लवकरात लवकर पूर्ण करण्यात येणार आहेत. मे २०१९ पर्यंत पहिल्या टप्प्यातील मेट्रो सेवा सुरू करण्याचा प्रयत्न असल्याची माहिती मुख्य कार्यकारी के. के. वरखेडकर यांनी दिली. सिडकोने मे २०११ मध्ये नवी मुंबई मेट्रोच्या प्रकल्पाला सुरुवात केली. बेलापूर ते पेंधर या ११ किलोमीटर अंतरावर सुरू केलेला प्रकल्प डिसेंबर २०१४ मध्ये पूर्णत्वाला जाईल, असे जाहीर केले होते. पण कंत्राटदारांच्या आर्थिक डिवाळखोरीमुळे सात वर्षे विलंब झाला. त्यामुळे सिग्नलिंग, टेलिकम्युनिकेशन ही अर्धवट आहेत. ११ किलोमीटरमधील ११ स्थानके बांधण्याचे काम सॅनहोज, महावीर व सुप्रिम या कंत्राटदारांना दिले. सॅनहोज कंपनीच्या माध्यमातून घेण्यात आलेली कामे महावीर व सुप्रिम कन्स्ट्रक्शन कंपनी विभागून करत आहे. मेट्रोसाठी तळोजा येथे २६ हेक्टर जागेवर १३२ कोटी खर्चून डेपो विकसित केले आहे. त्यात कारशेड, डब्यांची स्वच्छता, दुरुस्ती आदी कामांची यंत्रणा उभारली जाणार आहे.



बेलापूर ते पेंधर या ११ किलोमीटरच्या मेट्रो मार्गातील नऊ किलोमीटर मार्गातील रूळ टाकण्याचे काम आणि कंट्रोल रूमचे काम पूर्ण झाले आहे. या मार्गावर तीन डब्यांच्या आठ गाड्या धावणार आहे. त्यासाठी २४ डबे लागणार आहेत.

# साखर पुन्हा दीडशेनी घसरली

**भवानीनगर-** केंद्र सरकारने साखर दर नियंत्रणाची केलेली उपाययोजना तात्पुरतीच ठरली असून, पंधरा दिवसांपूर्वी प्रतिक्विंटल ३१६० रुपयांवर वाढलेले साखरेचे दर कालपासून पुन्हा ३ हजारांवर घसरले आहेत. अवघ्या दहाच दिवसांत साखरेचे भाव पुन्हा १५० रुपयांनी घसरले आहेत. त्यामुळे नुकतेच बॅंकेने वाढविलेले मूल्यांकनही घटण्याची चिन्हे असल्याने साखर कारखाने हवालदिल झाले आहेत.



पंधरा दिवसांपूर्वी केंद्र सरकारने साखर उद्योगाची अडचण लक्षात घेत साखर कारखान्यांनी किती साखर विकावी याचे निर्देश दिले होते. त्यानुसार फेब्रुवारीत कारखान्यांनी त्यांच्या उत्पादनापैकी ८६ टक्के साखर शिल्लक ठेवावी असे आदेश दिले. त्यामुळे साखरेचे दर २८६० रुपये प्रतिक्विंटलवरून ३१६० रुपयांपर्यंत पोचले.

# केजरीवालांचं घर पोलिसांनी पिंजून काढलं

**नवी दिल्ली-** दिल्लीचे मुख्य सचिव अंशु प्रकाश यांना मारहाण केल्याप्रकरणी 'आप'च्या आमदारांना अटक केल्यानंतर 'पुरावे' शोधण्यासाठी दिल्ली पोलिसांनी मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांच्या घराची झाडाझडती घेतली. केजरीवाल यांच्या घरातील २० तारखेचे सीसीटीव्ही फुटेज देण्यात यावेत, असं सांगितलं होतं. पण त्यांच्याकडून कोणतंही उत्तर मिळालं नाही. त्यामुळं झडती घ्यावी लागली, असं पोलिसांनी स्पष्ट केलं. मुख्यमंत्र्यांच्या घरातील सीसीटीव्ही कॅमेऱ्यांतील वेळ ४० मिनिटे ४२ सेकंद मागे होती, असं तपासातून समोर आलं आहे, अशी माहितीही पोलिसांनी दिली. अतिरिक्त पोलीस महासंचालकांच्या माहितीनुसार, केजरीवाल यांच्या घरातील सीसीटीव्ही फुटेज मागितले होते. पण त्यावर कोणतंही उत्तर मिळालं नाही. त्यामुळंच त्यांच्या घराची झडती घ्यावी लागली. याशिवाय घटनास्थळाची पाहणी करायची होती. 'केजरीवाल यांच्या घरात एकूण २१ सीसीटीव्ही कॅमेरे लावण्यात आले आहेत. त्यातील १४ कॅमेरे कार्यान्वित आहेत. उर्वरित कॅमेरे कार्यान्वित का नाहीत याची चौकशी केली जाईल,' असं अधिकाऱ्यांनी सांगितलं.



मुख्य सचिवांना ज्या ठिकाणी मारहाण झाली, तेथे सीसीटीव्ही कॅमेरे नव्हते. ड्रॉइंग रुमबाहेर आणि कॉरिडोरमध्ये कॅमेरे लावण्यात आले आहेत. त्यातील फुटेज तपासण्यात येतील, असंही अधिकाऱ्यांनी सांगितलं.

# रेशनवरील धान्यासाठी आधार अनिवार्य!

**मुंबई-** बायोमेट्रिक रेशन कार्ड धारकांनाच धान्य उपलब्ध करण्याच्या सरकारच्या निर्णयाविरुद्धची जनहित याचिका मुंबई हायकोर्टाने फेटाळून लावली. त्यामुळे आता आधारकार्ड शिधापत्रिकेशी जोडणे अनिवार्यच



असून १ मार्चपासून बायोमेट्रिक रेशन कार्ड धारकांनाच स्वस्त दरात धान्य उपलब्ध होणार आहे.

१ मार्चपासून बायोमेट्रिक रेशन कार्ड धारकांनाच स्वस्त दरात धान्य उपलब्ध होणार आहे. मात्र त्यासाठी राज्यभरात अनेक ठिकाणी रेशन कार्ड धारकांच्या माहितीचे संगणकीकरण करताना चुका झाल्या आहेत. एकट्या नाशिकमध्येच चुकीची माहिती अपलोड झालेल्या शिधापत्रिका ७४ हजारांहून अधिक असल्याचा आक्षेप घेत सरकारच्या निर्णयाविरोधात नाशिकमधील सामाजिक कार्यकर्ता अझीझ पठाण यांनी मुंबई हायकोर्टात याचिका दाखल केली होती. अन्नधान्य देताना बायोमेट्रिकचा डेटा आधार कार्डच्या डेटासोबत पडताळणी करून दिले जाणार आहे. मात्र बायोमेट्रिकच्या चुकीच्या रेकॉर्डमुळे दोन्ही डेटा जुळणार नाही आणि त्यामुळे अनेक गरीब लोक रास्त दरातील अन्नधान्य योजनेपासून वंचित राहतील, असा दावाही याचिकाकर्त्यांनी केला होता.

# अल्पवयीन मुलाला पोलिसाच्या मुलीने दिले गुप्तांगावर चटके

**कोल्हापूर-** भंगार गोळा करणाऱ्या एका अल्पवयीन मुलास घरकामासाठी ठेवून त्याचा लैंगिक आणि मानसिक छळ केल्याप्रकरणी कोल्हापूरच्या शाहूपुरी पोलिस ठाण्यात निलंबित पोलिस उपअधीक्षक मधुकर शिंदे यांची अल्पवयीन मुलीवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. मात्र या अल्पवयीन मुलाला आपल्या घरात बेकायदेशीरपणे ठेवल्याचा गुन्हा पोलिसांनी मधुकर शिंदे आणि त्यांच्या पत्नीवर का दाखल केला नाही असा सवाल उपस्थित होत आहे. पोलिस निलंबित परंतु आपल्याच वर्दीतल्या सहकाऱ्याचा बचाव करण्यासाठी हा पवित्रा घेत



आहेत का हाही प्रश्न उपस्थित होत आहे. दरम्यान, शुक्रवारी कोल्हापूर पोलिसांचे एक पथक फरार मधुकर शिंदे यांच्या शोधासाठी रवाना झाले आहे. कोल्हापूर शहरातील ताराबाई पार्क या उच्चभ्रू वस्तीत राहणारे निलंबित करण्यात पोलिस उपअधीक्षक मधुकर शिंदे यांच्या घरात घरकामासाठी ठेवलेल्या अल्पवयीन मुलाचा लैंगिक छळ आणि त्याच्यावर अमानुष अत्याचार झाल्याची तक्रार चाइल्ड लाइनच्या समुपदेशकांनी बाल कल्याण संकुलात १ फेब्रुवारी रोजी केली होती.

# केंद्र सरकार ९,५०० फायनान्स कंपन्यांना धक्का देण्याच्या तयारीत



**नवी दिल्ली– आर्थिक दृष्ट्या डेंजर झोनमध्ये (हाय रिस्क) असलेल्या ९५०० कंपन्यांना केंद्र सरकार धक्का देण्याच्या तायरीत आहे. केंद्र सरकारच्या अर्थमंत्रालयाच्या अधिपत्याखाली येणारी संस्था फायनान्शिअल इंटेलिजेंस यूनिटने (एफआययू) नॉन-बैंकिंग फाइनांन्शिअल कंपन्यांची (NBFCS) यादी तयार केली आहे. एफआययूचे म्हणने असे की, या कंपन्या आर्थिक दृष्ट्या डेंजर झोनमध्ये आहेत. एफआययूने या कंपन्यांचे वर्णन 'हाई रिस्क फाइनांन्शिअल इंस्टिट्यूशंस' असे केले आहे.**

एफआईयू-इंडिया वेबसाईटच्या हवाल्याने टाईम्स ऑफ इंडियाने दिलेल्या वृत्तानुसार, या यादीतील कंपन्यांना 'हाय रिस्क' कॅटेगरीत टाकण्यात आले आहे. ३१ जानेवारीपर्यंत मनी लॉन्ड्रींग ॲक्टच्या नियमांचे पालन केले नाही, या कंपन्यांवर ठपका ठेवण्यात आला आहे. ८ नोव्हेंबर २०१६च्या रात्री ५०० आणि १००० रूपयांच्या नोटा चलनातून बाद ठरवण्यात आल्या. त्यानंतर नॉन-बॅंकींग फायनान्शिअल कंपन्या आयकर विभागाच्या (इनकमटॅक्स डिपार्टमेंट) आणि अंमलबजानी संचलनालय (इडी) रडारवर आल्या. याचे कारण असे की, या कंपन्यांनी ५००, १००० रूपयांच्या नोटा बदलण्यासाठी त्या लोकांना मदत केली. ज्यांनी काळ्या धंद्यातून आर्थिक साम्राज्य उभे केले होते.

सहकारी बॅंकाही अडचणीत

दरम्यान, अनेक नॉन-बॅंकींग फायनान्शिअल कंपन्या आणि को-ऑफरेटीव्ह (सहकारी) बॅंकांनाही अवैध मार्गाने नोटांची देवाण-घेवाण केल्याचे पुढे आले आहे. या बॅंकांनी काल्या पैशालाच आगोदरची तारीख टाकून एफडी दाखवली आणि चेक दिले. ज्याला रिझर्व्ह बॅंक ऑफ इंडियाने (आरबीआय) डिफॉझिट म्हणून स्विकारण्यास नकार दिला.

दरम्यान, अवैध मार्गाने व्यवहार करणाऱ्या आर्थिक कंपन्यांबाबत सरकार कडक पावले टाकण्याच्या विचारात आहे.

# शिर्डीत बाप-लेकानेच केला अल्पवयीन मुलीवर बलात्कार

**शिर्डी-** शिर्डीतील एका नराधम बापलेकाने जवळ राहणाऱ्या अल्पवयीन मुलीवर अत्याचार केल्याची खळबळजनक घटना घडली आहे. याप्रकरणी काल रात्री उशिरा शिर्डी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला असून आरोपी बापाला पोलिसांनी गजाआड केलेय तर मुलगा पसार झाला आहे. आरोपी गजानन देशमुख आणि त्याचा मुलगा धनंजय देशमुख यांनी जवळ राहणा-या सतरा वर्षीय अल्पवयीन मुलीला काहीतरी वस्तु देण्याच्या बहाण्याने घरी बोलावले. मग तिच्या चहात गुंगीचं औषध मिसळून तिच्यावर अत्याचार केला. त्यानंतर तिच्यावर अत्याचार केल्याची तक्रार पीडित मुलीनं काल रात्री उशिरा शिर्डी पोलीस ठाण्यात दाखल केलीय. शिर्डी पोलीसांनी बलात्काराच्या गुन्ह्यासह ॲट्रोसिटी आणि बाल लैंगिक शोषणाचा गुन्हा दाखल केला असून आरोपी गजानन देशमुख यास गजाआड केलं आहे. तर मुलगा धनंजय देशमुख हा पसार झाला असून त्याचा पोलीस शोध घेताहेत दरम्यान या नराधम बापलेकाला फाशीची शिक्षा द्यावी अशी मागणी पिडीत मुलीच्या घरच्यांनी केली आहे. अशा प्रकारच कृत्य कोणीही करणार नाही यासाठी यांना कठोर शिक्षा करणे गरजेचं आहे.

# 'आधार' जोडलेल्या रेशनकार्डावरच स्वस्त धान्य!

**मुंबई - बायोमेट्रिक शिधापत्रिकाधारकांनाच १ मार्चपासून शिधावाटप दुकानांवर स्वस्त दरात धान्य उपलब्ध होणार आहे, या राज्य सरकारच्या अध्यादेशाविरोधात करण्यात आलेली जनहित याचिका उच्च न्यायालयाने कुठलाही अंतरिम दिलासा न देता निकाली काढली. त्यामुळे १ मार्चपासून बायोमेट्रिक शिधापत्रिकाधारकांनाच शिधावाटप दुकानांवर स्वस्त दरात धान्य उपलब्ध होणार आहे. सरकारच्या आदेशाला स्थगिती दिली त्याचा मोठ्या प्रमाणावर विपरीत परिणाम होऊ शकतो, असे एकीकडे याचिका निकाली काढताना स्पष्ट करतानाच ही याचिका अन्न व नागरी पुरवठा विभागाच्या सचिवांनी निवेदन म्हणून पाहावी आणि त्यावर आठवड्यात निर्णय घ्यावा अशी सूचना न्यायालयाने केली.**

ज्या शिधापत्रिकाधारकांची बायोमेट्रिक नोंदणी झालेली नाही त्यांचे काय, याचा खुलासा राज्य सरकारकडून वा शिधावाटप दुकानदारांकडून करण्यात आलेला नाही, असा आरोप करत सरकारच्या निर्णयाविरोधात आणि आदेशाला स्थगितीची मागणी करणारी जनहित याचिका नाशिकमधील सामाजिक कार्यकर्ते अजीज पठाण यांनी दाखल केली होती. न्यायमूर्ती शंतनु केमकर आणि न्यायमूर्ती राजेश केतकर यांच्या खंडपीठासमोर सुनावणी झाली. त्या वेळी न्यायालयाने याचिकाकर्त्यांने मागितलेला दिलासा देण्यास स्पष्ट नकार दिला. आता या आदेशाला अंतरिम स्थगिती दिली, तर त्याचे राज्यभरात विपरीत परिणाम होतील, अशी भीतीही न्यायालयाने नकार देताना व्यक्त केली.

राज्यात अनेक ठिकाणी या माहितीचे संगणकीकृत करण्यात चुका झाल्याच्या तक्रारी आलेल्या आहेत. त्यानुसार ही माहिती ऑनलाईन पद्धतीने अपलोड करणाऱ्याकडून शिधापत्रिकाधारक व्यक्तीच्या नावावर भलत्याच कुणाचे तरी छायाचित्र, काही ठिकाणी दुसऱ्याच कुणाच्या तरी हातांचे ठसे, चुकीचा पत्ता टाकण्याच्या चुका वा चुकीची माहिती अपलोड करण्यात आली आहे. एकट्या नाशिक जिल्ह्यात साडेसात लाख शिधापत्रिकांपैकी चुकीची माहिती अपलोड झालेल्या शिधापत्रिकांची संख्या ७४ हजारांवर असल्याचा दावा याचिकेत करण्यात आला आहे. हीच बाब गुरूवारी झालेल्या सुनावणीच्या वेळीही न्यायालयाच्या निदर्शनास आणून देण्यात आली. नाशिकच्या पालकमंत्र्यांकडे तक्रार करूनही याबाबत काहीच दखल घेतली नसल्याचेही याचिकाकर्त्यांच्या वतीने न्यायालयाला सांगण्यात आले. एकट्या नाशिक जिल्ह्यात साडेसात लाख शिधापत्रिकांपैकी चुकीची माहिती अपलोड झालेल्या शिधापत्रिकांची संख्या ७४ हजारांवर असल्याचा दावा याचिकेत करण्यात आला आहे.

**संगणकीकृत शिधापत्रके ८० टक्के**


सार्वजनिक वितरण व्यवस्था सुधारण्याच्या तसेच धान्यचोरीच्या प्रकारांना चाप लावण्याच्या दृष्टीने २०१३ मध्येच सरकारने शिधापत्रिकाधारकांची माहिती आधारकार्डशी जोडून ती संगणीकृत करण्यास



सुरूवात केली. त्यानुसार शिधावाटप दुकानदाराला त्याच्या दुकानातील माहिती संकेतस्थळावर अपलोड करण्याचे निर्देशही दिले होते. अशा प्रकारे माहिती अपलोड करण्याचे ८० टक्के काम पूर्ण झाल्याचा दावाही सरकारतर्फे करण्यात येत आहे.

# सुरक्षा दलांना ड्रोन्सची गरज

**नवी दिल्ली -** भारतीय सुरक्षा दलांना येत्या दशकात चारशे ड्रोन, दिशादर्शक ऊर्जा शस्त्रांची (डीईडब्लू) गरज आहे. यामध्ये लढाऊ आणि पाणबुडीतून नियंत्रित करणाऱ्या लढाऊ ड्रोनचा समावेश आहे. तसेच, शत्रूला लक्ष्य करण्यासाठी आणि त्यांचे प्रसंगी उपग्रह नष्ट करण्यासाठी 'हाय एनर्जी लेझर' आणि 'हाय पॉवर्ड मायक्रोवेव्हज'ची गरज आहे. संरक्षण मंत्रालयाच्या 'टेक्नॉलॉजी परस्पेक्टिव्ह अँड कपॅबिलिटी रोडमॅप - २०१८'मध्ये याचा उल्लेख करण्यात आला आहे. २०२०च्या दशकात सुरक्षा दलांना आवश्यक असणाऱ्या शस्त्रास्त्रांचा आढावा उद्योगांना यामुळे मिळणार आहे.



हा अहवाल ८२ पानांचा आहे. 'हा अहवाल उद्योगांना तांत्रिक विकासाच्या दृष्टिने नियोजन करण्यास अथवा पुढाकार घेण्यास मार्गदर्शक ठरेल. तसेच, भागीदारी आणि उत्पादनांसाठी करार करण्यासही उपयुक्त ठरेल. भारतीय उद्योगांनी विकासाच्या दृष्टिने जाताना आणि कुठलेही करार करताना केंद्र सरकारचा 'मेक इन इंडिया' उपक्रमाचे महत्त्व अधोरेखित करायला हवे.' पुढच्या पिढीच्या पाणबुडी, विनाशिका, फ्रिगिटपासून क्षेपणास्त्रे, पायदळाची शस्त्रे, विशेष दारुगोळा, रासायनिक, जैविक, आण्विक सुरक्षा यंत्रणा यांच्याबरोबरच सुरक्षा दलांना मोठ्या प्रमाणावर लागणाऱ्या मानवरहित हवाई विमानांची (यूएव्ही, ड्रोन) गरजही त्यात अधोरेखित करण्यात आली आहे. सध्याच्या काळात अचूक गस्तीसाठी आणि शत्रूच्या मोठ्या ठिकाणांना लक्ष्य करण्यासाठी ड्रोनची गरज आहे. संरक्षण दलांकडे सध्या दोनशे ड्रोन आहेत. त्यातील बहुतांश ड्रोन इस्रायलकडून आयात करण्यात आले आहेत. याद्वारे दीर्घ पल्ल्याचे संरक्षण आणि अचूक लक्ष्यभेद साध्य केला जातो. इस्रायलकडून घेतलेले हॅरोप किलर किंवा कॅमिकेझ ड्रोन यांचाही यामध्ये समावेश आहे.




हे साप्ताहिक मालक, मुद्रक, प्रकाशक - दिपक मोरेश्वर नाईक यांनी सोमानी प्रिंटिंग प्रेस, गाला नं.३-४, अमीन इंडस्ट्रियल इस्टेट, सोनावला क्रॉस रोड नं.४, गोरेगांव (पूर्व), मुंबई - ४०० ०६३ येथे छापून २, राजाराम को.ऑ.हौ.सो. बंदरवाडी, नवघर रोड, शनी मंदिरा जवळ, भाईंदर (पूर्व), ठाणे - ४०१ १०५ येथे प्रकाशित केले. या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यांच्याशी संपादक सहमत असतीलच असे नाही. (सर्व वाद ठाणे न्यायालयाच्या कक्षेत)